# निशाणी क्र.६ खालील आदेश

(अधिघोषीत दि. ०५/१०/२०२४)

अर्जदाराने प्रस्तुतची मागणी निशाणी क्र.६ खाली महिलांचे घरगुती हिंसाचारापासून प्रतिबंधक कायदयाचे कलम २३ अन्वये शपथपत्र दाखल करून केलेली आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे** –

**०२.** अर्जदार व सामनेवाले नं.१ यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे व समाजाचे रितीरिवाजाप्रमाणे दि. १८/०१/२०२० रोजी भगवती मंगल कार्यालय, राहुल नगर, जेलरोड, ता. जि. नाशिक येथे झालेला आहे. सदर लग्नसंबधातुन काही एक अपत्य झालेले नसुन अर्जदार व सामनेवाला नं.१ यांचे पती पत्नीचे नातेसंबंध अद्याप कायम आहेत. सदर विवाहाचा संपुर्ण खर्च हा अर्जदार यांचे वडिलांनी केलेला व सोसलेला आहे. अर्जदाराचे वडिलांनी सामनेवालेच्या मागणीप्रमाणे मोठा खर्च अंदाजे १०,००,०००/- खर्च करुन सदर विवाह करुन दिलेला आहे. विवाहापुर्वी सामनेवाले यांनी अर्जदाराचे वडिलांकडे अचानकपणे ५,००,०००/- रुपयांची मागणी केली. परंतु एवढी रक्कम उपलब्ध नसल्याने त्यापैकी २,००,०००/- रुपये देतो व उर्वरीत नंतर देतो असे सांगुन काही नातेवाईकांची मध्यस्थी करुन सदर वेळ सावरुन नेली. तसेच सामनेवालेचे भाउ यांनी

विवाहाचे बिदाईचे वेळी धमकाविले की, उर्वरीत रक्कम आली नाही तर मुलगी घेवुन बसावे लागेल अशी धमकी अर्जदाराच्या वडीलांना दिली.

०३. अर्जदार पुढे कथन करते की, सामनेवाले यांनी विवाहापुर्वी अर्जदार व तिच्या घरच्यांना सांगितले होते की, सामनेवाला क्र. १ हा पदवीधर असुन मॅकफास्मोटेक, सिन्नर या कंपनीमध्ये कायमस्वरुपी तत्वावर नोकरीस असुन २५ ते ३० हजार पगार मिळतो असे सांगितले होते. परंतु लग्नानंतर अर्जदारास कळाले की, सामनेवाला याचे पदवीपर्यंतचे शिक्षण झालेले नसुन तो नोकरीवर जात नाही. तेव्हा अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ यांस याबाबत विचारणा केली असता त्याने, त्याची नोकरी गेली असुन त्याला नोकरी नाही व अर्जदाराने त्याला काही विचारायचे नाही, ती बायको असुन तिने तेवढेच रहायचे, त्यांच्या घरात स्त्रीयांना बोलण्याचा अधिकार नाही. अर्जदाराला सामनेवालेचे असे बोलणे ऐकुन मोठा मानसिक धक्काच बसला. अर्जदाराने सामनेवाल्यास असे का बोलतात अशी विचारणा केली असता सामनेवाले क्र. २ ते ४ हया व्यकती अर्जदार हिचे अंगावर धावुन गेले व तिला मोठया प्रमाणात मारहाण केली. अर्जदार हि भविष्यात सगळे चांगले होईल या अपेक्षेने तिथेनेच राहिले त्यानंतर वेळोवेळी वेगवेगळया कारणाने सामनेवाले व सामनेवालेची आई व वडील म्हणजेच अर्जदाराची सासु व सासरे, तो व अर्जदाराचे दिर यांनी अर्जदारस मोठया प्रमाणात मारहाण केली.

०४. अर्जदार पुढे कथन करते की, विवाहानंतर तिला माहेरी जावु दया अशी विनंती तिने सामनेवाला यांना केली तेव्हा सामनेवाला यांनी सांगितले की, ''माझ्या आईला आजुन माझ्या बापाने माहेरी जावु दिले नाही तर मी तुला कसे पाठवणार'' असे बोलुन

तिला केवळ घरातील कामगार या पध्दतीने वागविले. सामनेवाले अर्जदारास फोनही वापरु देत नसे. तसेच अर्जदाराची सासु व दिर अर्जदारास अश्लील शिवीगाळ करुन अर्जदाराचे चारीत्र्यावर संशय घेत असे. तसेच अर्जदाराचे माहेरचे कोणीही त्यांच्या चौकशी कामी आले तर सामनेवाले त्यांचे सोबत बोलु देत नव्हते व त्यांना घरामध्ये घेत नसत व दारातूनच बोलत असे तुम्ही मुलीच्या घरी कसे येतात, मुलीच्या सासरी पाणीही पीत नाही याची जाणीव आहे का नाही असे बोलनू त्यांना पाणीही न देता हिसकावून देत असत.

**०५.** अर्जदार पुढे कथन करते की, दि.१६/११/२०२० रोजी भाउबीज असल्याने अर्जदाराने माहेरी जाण्याची आग्रह धरला, परंतू सामनेवालेने अर्जदारास अतिशय खालच्या पातळीची अश्लील शिवीगाळ केली व घरातून बाहेर हुसकावून दिले. अर्जदार तिच्या माहेरी गेली व भाउबीज सण करुन सासरी तिच्या वडीलांसोबत आली असता सामनेवालेंनी अर्जदाराच्या वडीलांना ' तु इला इथे का घेवून आला ही फालतू मुलगी आहे, आम्हाला ही नको आहे' असे बोलून अर्जदारास अपमानास्पद वागनूक देवून दारातून बाहेर हुसकावून दिले.

**०६.** अर्जदार पुढे कथन करते की, दि. २८.०५.२०२१ रोजी अर्जदार माहेरी असतांना देखील सामनेवाले अर्जदाराच्या घरी आले व अर्जदाराच्या वयस्कर वडीलांना मारहाण करुन ' तु जोपर्यंत पैसे देणार नाही तोपर्यंत इला इथेच सांभाळ' असे बोलले त्यामूळे अर्जदाराने नाशिकरोड पो.स्टे. ला दि. २९/०५/२०२१ रोजी तक्रर दिली.

**०७.** अर्जदार पुढे कथन करते की, अर्जदारास उत्पनाचे काहीएक साधन नाही. अर्जदारास सामनेवाले यांचे शारीरीक व मानसिक त्रासामुळे तसेच सामनेवाले यांनी दिलेल्या

धमकीमुळे आपले माहेरी आश्रीत म्हणुन राहुन लाजीरवाणे जीवन जगावे लागत आहे. याउलट सामनेवाला क्र. १ हा एसी, फ्रीज असे इलेक्ट्रानिक्स वस्तू विक्री व दुरुस्तीचे काम करतात व त्यापासून त्यास दरमहा ३० ते ३५ हजार रुपये पगार मिळतो. तसेच सामनेवाला यांची वडीलोपार्जीत बागायत शेतजमीन असून त्यातून वार्षिक अंदाजे ७ ते ८ लाख रुपये उत्पन्न मिळते तसेच सामनेवाले नं. २ ते ४ हे नोकरी करीत असून त्यांना देखील चांगले वेतन आहे. सामनेवाला नं. १ यांचेवर अर्जदाराशिवाय इतर कुणीही अवलंबुन नाही. सामनेवाला नं. १ यांची अर्जदार हिस स्वतंत्र अन्नवस्त्र खावटी देण्याची ऐपत आहे. अर्जदार ही सामनेवाला नं. १ याची कायदेशीर पत्नी असुन सामनेवाला नं. १ याने अर्जदाराचा कुठलाही संयुक्तीक कारणाशिवाय एकतर्फा त्याग करुन तीचे अन्नवस्त्र, औषधपाणी व इतर दैनंदिन गरजांची पुर्तता करणेकामी काहीएक तजवीज केली नाही. सामनेवाला नं. १ हा चैनीत व मौजमजेत जीवन जगत आहे. म्हणुन अर्जदारास सामनेवाले विरुध्द सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

०८. अर्जदाराचा मुळ अर्जाचा अंतिम गुणदोषावर निकाल होण्यास काही कालावधी लागणार आहे. अर्जदारास मुळ अर्जात निश्चित यश येण्याची खात्री व भरोसा आहे. अर्जदाराचे मुळ अर्जाचा अंतिम गुणदोषावर निकाल होईपावेतो अर्जदारास हाल अपेष्टेत व उपाशी पोटी जीवन जगावे लागणार आहे. अर्जदारास रकमे अभावी अत्यंत हाल अपेष्टा सहन कराव्या लागणार आहे. त्यासाठी अर्जदारास मुळ अर्जाचा अंतिम निकाल होईपावेतो अंतरिम अन्नवस्त्र रक्कम मिळणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे व आवश्कय आहे. सबब अर्जदाराने अन्नवस्त्र खावटीपोटी दरमहा रक्कम रुपये १०,०००/– तसेच घरभाड्यापोटी

रक्कम रुपये ५,०००/– अर्ज दाखल तारखेपासुन मिळण्याची विनंती केलेली आहे. अर्जदाराने नि.क्र.२४ अन्वये तिचे मालमत्ता व दायीत्वाचे शपथपत्र दाखल केलेले आहे.

**<u>सामनेवालेचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे</u> –**

**०९.** सामनेवालेने नि.क्र.१३ अन्वये त्यांचे अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. सामनेवालेचे जबाबानुसार अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज खोटा, चुकीचा, बिनबुडाचा व बेकायदेशीर असुन तो त्यांना मान्य व कबुल नाही. अर्जदार व सामनेवला नं. १ यांचा विवाह दि. १८/०१/२०२० रोजी झालेनंतर अर्जदार हि सामनेवाले नं. १ यांचे एकत्र कुटुंबात नांदणेस आली असता अर्जदार ही सामनेवाले नं. १ पासून आजरोजी गरोदर नाही.

**१०.** सामनेवाला पुढे कथन करतो की, लग्न झालेनंतर अर्जदारचे कॉलेज चालू झाले व त्याकरीता अर्जदाराचे जाणे–येणे, पुस्तके, कॉलेज फी, कपडे इ. करीता रु. १०,०००/– खर्च सामनेवालेने केला आहे. तसेच परीक्षेकरीता अर्जदार माहेरी गेली होती व महिनाभर ती माहेरी राहीली होती. तसेच अर्जदार ही मित्र–मैत्रीणींसोबत पांडवलेणी, रामसेज किल्ला, चामरलेणी, सोमेश्वर अशा सहलीच्या ठिकाणी जायची व पार्टी करत रहायची. तसेच अर्जदाराने दि. ०१/०६/२०२० रोजी ॲड. संसारे यांचेमार्फत खोटया आशयाची व सामनेवाले यांचेवर बिनबुडाचे आरोपीची नोटीस पाठविली आहे. तसेच दि. १६/११/२०२० रोजी सामनेवाले यांची आई अर्जदारास भाउबिज निमित्त अर्जदार हिच्या भावाला चांदीचा ग्लास भेट दिला परंतू अर्जदाराने सख्या भावाला सोडून मानलेल्या भावाला ओवाळायला गेली. तसेच अर्जदार हिच्या माहेरुन अर्जदार हिच्याकरीता प्रत्येक

सणाला पैठणी, सोने व चांदी घेण्याची मागणी येवू लागली व त्याप्रमाणे सामनेवाले तिच्या गरजा पूर्ण करत होते. तसेच अर्जदार म्हणत असे की गर्भधारणामूळे व मुल जन्मामूळे शरीराची आकृती खराब होते म्हणून अर्जदाराने तीच्या बहिणीचे मूल दत्तक घेण्याचे ठरविले. तसेच अर्जदार ही लग्नानंतर १८ महिन्यापैंकी फक्त ५ महिने सासरी राहीली आहे.

**११.** सामनेवाला पुढे कथन करतो की, अर्जदार ही दि. २०/११/२०२० रोजी स्वतः बॅग भरुन घर सोडून गेली तेव्हा सामनेवालेने अडवण्याचा प्रयत्न केला परंतू अर्जदाराने ऐकले नाही. तसेच दि.२८/०५/२०२१ रोजी सामनेवाले व त्यांचे भाउ सुदर्शन अर्जदाराच्या घरी आले नांदण्यास येण्याची विनंती केली परंतू अर्जदाराने नकार दिला. तसेच अर्जदाराने तिची बदनामी होवू नये म्हणून दि. २९/०५/२०२१ रोजी नाशिकरोड पो.स्टे. येथे खोटी तक्रार दाखल केली आहे. तसेच दि. ०५/०६/२०२१ रोजी सामनेवाले यांचेविरुध्द महिला आयोग यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. तसेच दि. २५/०६/२०२१ व दि. १८/०८/२०२१ रोजीही अर्जदार व तिचे कुटुंबियांनी सामनेवाले यांचेविरुध्द महिला आयोग यांचेकडे चौकशी झाली व सामनेवालेकडे नांदावयास जावे असा आदेश दिला परंतू तरीही अर्जदाराने सदर आदेशाचे पालने केले नाही. तसेच दि. ०२/१२/२०२१ रोजी सामनेवालेने मध्यस्थी मार्फत नांदण्यास येण्यास सांगितले असता अर्जदार यांनी नांदायची इच्छा नाही व फारकत घ्यावयाची आहे व अर्जदारास सामनेवालेने रुपये १०,००,०००/– दयावी अशी मागणी केली आहे.

**१२.** सामनेवाला पुढे कथन करतो की, कोविड–१९ या जागतीक महामारिमुळे सामनेवाले यांना नोकरीतून अत्यंत अल्प उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे त्यांना कुटुंबावर

अवलंबुन राहावे लागत आहे. त्यामुळे अर्जदाराचा सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती सामनेवालेने केलेली आहे. सामनेवाले नि.क्र.१८ अन्वये त्याचे मालमत्ता व दायीत्वाचे शपथपत्र दाखल केलेले आहे.

**१३.** गैरअर्जदारातर्फे प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी माननीय दिल्ली उच्च न्यायालयाच्या दोन न्यायनिर्णयाचे आधार घेण्यात आलेले आहे. त्यापैकी ***संजय भारद्वाज वि. स्टेट Laws(DLH)-2010-8-141*** या न्यायनिर्णयात अंतिम खावटीची रक्कम ठरविण्यासंदर्भात मा. दिल्ली उच्च न्यायालयाने मार्गदर्शन केले असुन सदर प्रकरणाची वादतथ्ये व नमुद प्रकरणाची वादतथ्ये भिन्न असुन प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी खावटीची रक्कम ठरवितेवेळी सविस्तर कारणमिमांसा पुढे देण्यात आली असुन सदर न्यायनिर्णय व सद्यस्थितीतील प्रकरणातील स्थिती व वादतथ्ये दोन्ही भिन्न असल्याने मा. उच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वे सदर प्रकरणात सादर लागु होत नसल्याचे माझे मत आहे. त्याचप्रमाणे मा. दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या ***दमनरित कौर वि. इंदरमित जुनेजा Laws(DLH)-2012-5-462*** या न्यायनिर्णयाकामी मा. दिल्ली उच्च न्यायालयाने पिडीता पत्नी उच्च शिक्षीत असुन कमावती असेल तर पतीवर तिची जबाबदारी लादु नये असे नमुद असले तरी प्रस्तुत न्यायनिर्णयातील वादतथ्ये व प्रस्तुत प्रकरणातील वादतथ्ये भिन्न असल्याने सदर न्यायनिर्णयातील मार्गदर्शक तत्वे सदर प्रकरणाच्या सद्यस्थितीत सादर विचारात घेता येवु शकत नाही.

**१४.** अर्जातील कथन व सामनेवालेचे म्हणणे तसेच युक्तिवाद लक्षात घेता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण झालेले असून त्याबाबतचे निष्कर्ष प्रस्तुत मुद्यासमोर

नमुद करुन त्याबाबतची कारणमिमांसा खाली देत आहे.

| **अनु क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **०१.** | अर्जदार प्रथमदर्शनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याची बाब शाबीत करते काय ? | **होय** |
| **०२.** | अर्जदार अंतरिम पोटगीसाठी रक्कम रू.१०,०००/– मिळण्यास पात्र असल्याचे प्रथमदर्शनी शाबित करते काय ? | **अंशतः होय** |
| **०३.** | अर्जदार ही अंतरिम मागणीकामी घरभाडेपोटी रक्कम रूपये ५,०००/– मिळण्यास पात्र असल्याचे प्रथमदर्शनी शाबित करते काय ? | **अंशतः होय** |
| **०४.** | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक ०१ करीता** –

**१५.** प्रस्तुत अर्जान्वये अर्जदाराने महिलांचे घरगुती हिंसाचापासून प्रतिबंधक कायद्याचे कलम २३ अन्वये मागणी केलेली आहे. प्रस्तुत कायद्याचे मुळ तत्व अथवा उद्देश लक्षात घेता पिडीत महिलेला त्वरीत न्याय मिळावा याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने केवळ प्रथमदर्शनी हिंसाचार झाल्याची बाब अर्जदाराने शाबीत करणे अपेक्षीत असते. अर्जदाराने शपथेवर दिलेला तोंडी पुरावा देखील त्याकरीता पुरेसा असतो.

**१६.** प्रस्तुत अर्जाप्रकरणी अर्जदाराने कथन केलेल्या दि.१६/११/२०२० रोजी

भाउबीज असल्याने अर्जदाराने माहेरी जाण्याची आग्रह धरला, परंतू सामनेवालेने अर्जदारास अतिशय खालच्या पातळीची अश्लील शिवीगाळ केली व घरातून बाहेर हुसकावून दिले, तसेच दिनांक २८/०५/२०२१ रोजी सामनेवाले अर्जदाराच्या घरी जावुन तिच्या वडीलांना मारहाण केली व सदर प्रकरणाबाबत दिनांक २९/०५/२०२१ रोजी नाशिकरोड पोलीस ठाण्यात सामनेवाल्यांविरुध्द तक्रार दिल्याचे अर्जदाराने शपथपूर्वक कथन केले असुन सामनेवाले अर्जदारास इतर कोणाशीही फोनद्वारे संपर्क ठेवु देत नसल्याचे तसेच माहेरी जाण्यास देखील मज्जाव करीत असल्याचे तिने शपथपूर्वक कथन केले असुन सदर विधाने जरी सामनेवाला यांनी नाकारली असली तरी त्यांच्या कथनाला पुष्टी देणारा प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. प्रस्तुत प्रकरणाचे स्वरुप लक्षात घेता अर्जदाराने केलेल्या बाबी प्रकरणाच्या सद्यस्थितीत आहे तशा लक्षात घेता येत असुन उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने अर्जदाराने तिचा मानसिक छळ झाल्याचे प्रथमदर्शनी शाबीत केले आहे. करीता मुद्दा क्र. १ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ ते ४ करिता –</u>**

**१७**. अर्जदाराने स्वतः करीता अंतरिम मागणी अंतर्गत दरमहा एकुण पोटगी रू.१०,०००/– ची मागणी केलेली असुन, घरभाड्यापोटी रक्कम रुपये ५,०००/– दरमहा अंतरिम मागणी केलेली आहे. तिच्या कथनानुसार सामनेवाले क्र.१ वर तिचे व्यतिरिक्त इतर कोणीही अवलंबुन नसल्याचे तिचे कथन केलेले आहे. परंतु, अर्जदार स्वतःच सामनेवाला क्र.१ लग्नानंतर कोणताही कामधंदा करीत नसल्याचे नमुद करते. परंतु,

तिच्या पुढील कथनानुसार तो इलेक्टीक उपकरणे दुरुस्त करुन दरमहा ३० ते ३५ हजार रुपये उत्पन्न मिळवीत असल्याचे तिचे कथन आहे. तसेच तिने तिचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रात ३५ हजार रुपये उत्पन्न मिळवित असल्याचे नमुद केले आहे. याउलट, सामनेवाला क्र.१ याने त्यांच्या मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रात तो मजुरी करुन दरमहा ७ हजार रुपये उत्पन्न मिळवीत असल्याचे कथन करुन दरमहा ५ हजार रुपये खर्चाकामी लागत असल्याचे त्याने शपथपूर्वक कथन केले आहे. त्याच्यावर त्याचे आई–वडील अवलंबुन असल्याचे त्याने कथन केले असुन आई–वडीलांवर होणारा वैद्यकीय खर्च दरमहा ४ हजार रुपये असल्याचे त्याने नमुद करुन वैयक्तिक व कौटुंबिक खर्च सुमारे ८ हजार असल्याचे त्याने शपथपूर्वक नमुद केले आहे. तसेच अर्जदार स्वतः नोकरी करुन दरमहा ३० हजार रुपये उत्पन्न मिळवीत असल्याचे त्याने मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रात नमुद केले आहे. परंतु, अर्जदार नोकरीस असल्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दिल्याचे दिसुन येत नाही.

१८. आधिच उल्लेख केल्याप्रमाणे ज्या कायद्याखाली सदर अर्ज करण्यात आला आहे त्याचा हेतू व कायद्याची स्थायी स्थिती लक्षात घेता अर्जदाराने शपथपूर्वक केलेली विधाने प्रकरणाच्या सद्यस्थितीत ग्राह्य धरण्यात येतात. अर्जदार कमावती असल्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. याउलट, सामनेवाला क्र.१ याचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रानुसार त्याने त्याचे मासिक उत्पन्न ७ हजार रुपये दर्शविले असुन त्याच्यावर अवलंबुन असणा–या व्यक्तिंचा वैद्यकिय खर्च दरमहा ४ हजार व दैनंदिन खर्च सुमारे ८ हजार असल्याचे शपथपूर्वक नमुद केलेले आहे. सबब, सामनेवालेने त्याचे

मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रात तो स्वतःसाठी व त्याचेवर अवलंबुन व्यक्तींसाठी असे एकुण १२,०००/– हजार रुपये दरमहा खर्च करु शकण्याची क्षमता बाळगतो असे नमुद केल्याचे दिसुन येते. तसेच सामनेवालाने स्वतःहुन नोकरी चा राजीनामा दिल्याचे टरमिशन लेटर निशाणी क्र. २६ अन्वयेच्या दस्तऐवज यादीसमवेत अर्जदाराने दाखल केल्याचे दिसून येते. सबब, स्वतःहून नोकरीचा राजीनामा देवून आपण पत्नीचे पालनपोषन करणेस असमर्थ असल्याचे सामनेवाला क्र. १ चे म्हणणे ग्राहय धरणे न्यायोचित होणार नाही. अर्जदार त्याची कायदेशीर पत्नी असुन तिच्या पालनपोषणाची कायदेशीर व नैतिक जबाबदारी तो नाकारु शकत नाही. अर्जदार ही त्याची कायदेशीर पत्नी असुन तिच्या अन्नवस्त्र् निवा–याची सोय करणे सामनेवाला क्र. १ वर बंधनकारक आहे.

**१९.** अर्जदार हि आजरोजी उभयपक्षांना मान्य असल्याप्रमाणे सामनेवाले क्र. १ ची पत्नी असुन केवळ अर्जदार त्याच्यापासुन विभक्त राहते म्हणुन तो त्याची कायदेशीर व नैतीक जबाबदारी नाकारू शकत नाही. त्याचप्रमाणे सामनेवाले क्र. १ याने मालमत्ता व दायीत्वाचे शपथपत्रात अर्जदार कमवत असल्याबाबत जरी कथन केलेले असले तरी त्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. विवाहानंतर पत्नीची संपुर्ण जबाबदारी हि पतीची असते करीता उपरोक्त परिस्थितीत ज्यावेळी अर्जदाराने तिच्यावर कौटुंबीक हिंसाचार झाल्याची बाब प्रथमदर्शनी शाबीत केलेली आहे, त्यावेळी प्रस्तुत कायद्याचे उद्देश लक्षात घेता, अर्जदार क्र.१ स्वतःसाठी अंतरीम पोटगीची तसेच घरभाडेपोटी रक्कम मिळण्यास पात्र असल्याचे माझे मत आहे.

**२०.** अर्जदार स्वतःसाठी रक्कम रुपये १०,०००/– दरमहा अंतरीम पोटगीची

व ५,०००/– रुपयांची घरभाडेपोटी मागणी केलेली आहे. उभयपक्षाने प्रकरणाच्या या स्थितीत सामनेवाले क्र. १ च्या उत्पनाबाबत प्रथमदर्शनी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. तसेच सामनेवाले क्र. १ याचे नावे असलेल्या शेतजमिनीबाबत देखील कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल नाही. परंतु आधीच उल्लेख केल्याप्रमाणे दरमहा १२,०००/– रुपये स्वतःसाठी व अवलंबुन असणा–या व्यक्तींसाठी खर्च करण्यासाठी गैरअर्जदार क्र. १ सक्षम असल्याचे त्याचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रावरुन दिसुन येते. सबब, सामनेवाले क्र. १ याची जिवनशैली पहाता तिच जिवनशैली जगता येण्याइतपत अंतरीम पोटगी मिळण्यास अर्जदार पात्र आहे. सामान्यतः कोणताही इसम काही रक्कम शिल्लक टाकुन दैनंदिन खर्च करीत असतो. त्याचप्रमाणे सामनेवाले क्र. १ शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असुन कोणतीही व्यक्ती मोलमजुरी करुन रुपये ५००/– प्रतिदीन कमावु शकते. सबब, प्रस्तुत प्रकरणातील उभयपक्षांची जिवनशैली व सध्याच्या महागाईच्या काळाचा विचार करता गैरअर्जदार सुमारे १५,०००/– ते २०,०००/– रुपये कमवु शकतो असे गृहित धरुन अंतमरीम पोटगीचीव घरभाड्याची रक्कम ठरविण्यात येत आहे. करीता वाढत्या महागाईच्या काळात अर्जदार व गैरअर्जदार यांचे राहणीमानाचा दर्जा लक्षात घेऊन गैरअर्जदार क्र.१ वर अवलंबुन इतर व्यक्तीचा विचार करता, अर्जदार दरमहा रू.४,०००/– अंतरीम पोटगीकामी मिळण्यास व घरभाड्यापोटी रक्कम रुपये १,०००/– दरमहा मिळण्यास पात्र असल्याचे माझे मत असुन मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

१ अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२ सामनेवाले क्र.१ याने अर्जदारास अंतरीम पोटगीकामी रक्कम रूपये ४,०००/– (चार हजार रुपये फक्त) दरमहा व अंतरीम घरभाडेपोटी रक्कम रूपये १,०००/– (एक हजार रुपये फक्त) दरमहा अर्ज दाखल तारखेपासून प्रस्तुत प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपावेतो द्यावे असे आदेशीत करण्यात येते.

BHANDARI DHANASHREE RAGHUNATH
Digitally signed by BHANDARI DHANASHREE RAGHUNATH
Date: 2024.10.07 15:10:04 +0530

**(धनश्री आर. भंडारी)**

दिनांक – ०५/१०/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

स्थळ – नाशिकरोड नाशिकरोड.